क्र. १३८ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

७ एप्रिल २०२३

## पवित्र शुक्रवार

### निवेदक

जगाच्या तारणासाठी येशूख्रिस्त आपल्या पित्याच्या आज्ञेत राहिला. अगदी, उदरापासून ते जन्मापर्यत, जन्मापासून ते गेथसेमनीपर्यंत, गेथसेमनीपासून ते कालवरीपर्यंत. देवपित्याच्या तारणदायी योजनेला ख्रिस्ताने दिलेल्या होकारानेच मानवाचे तारण झाले आहे, पण त्यासाठी येशूला मरणप्राय वेदना व दु:खसहन करावे लागले. आपल्या पित्याच्या इच्छेसाठी येशूने आपल्या जीवनाची, सर्वस्वाची होळी पेटवून क्रुसावर रक्त सांडले व त्याद्वारे मानवाचे तारण केले. म्हणून आजच्या दिवसाला शुभ शुक्रवार म्हणतात.

**निवेदक:** भाविकहो, आजच्या विधीचे तीन मुख्य भाग आहेत.

१. प्रभू शब्दविधी.

२. क्रूस वंदना

३.प्रभू भोजनविधी

मिरवणुकीने धर्मगुरू वेदीजवळ येत आहेत. वेदीजवळ आल्यावर ते पश्चातापदर्शक लोटांगण घालतील. आपल्या वैयक्तिक आणि आपल्या सर्वांच्या पापांच्या क्षमेसाठी पश्चातापी अंत:करणाने परमेश्वराला शरण जाऊन प्रार्थना करतील. सर्व भाविकांनी उभे राहून पश्चात्तापी अंत:करणाने उपासनेत सहभाग घेऊन, मनोमन प्रार्थना करायची आहे.

### प्रस्तावना

क्रूस म्हणजे ख्रिस्ती श्रध्दा, क्रूस म्हणजे ख्रिस्ताचे जीवन, मरण व पुनरूत्थान. क्रूस म्हणजे त्याग व आत्मबलिदान. क्रूस म्हणजे ख्रिस्ताचे दु:खसहन. क्षमा आणि प्रेम ह्यांनी बनलेला क्रूसाचा आडवा भाग म्हणजे मानवाच्या पापांचा, मोहाचा, वासनांचा, अनितीचा, दुष्कृत्यांचा अंध:कार. ह्या अंध:काराला छेदून जाणारा उभा भाग म्हणजे पश्चात्ताप व सार्वकालिक जीवनाचा प्रकाश होय. अशा ह्या क्रूसावर येशू आपल्या पित्यावरील प्रेमासाठी व आपल्या पापांसाठी विव्हळला, तळमळला अन् पदोपदी रक्तबंबाळ होऊन कालवरीचा डोंगर चढला. संपूर्ण मानवजातीला पापांपासून मुक्ती मिळावी म्हणून त्याने क्षमा अन् प्रीतीचा संदेश दिला, व क्रूसावर प्राण सोडला. त्याचक्षणी येरूशलेमच्या देवळाचा पडदा वरपासून खालपर्यंत फाटला, सर्वत्र अंधार पसरला, संपूर्ण निसर्ग स्तब्ध झाला. असे हे दैवी रहस्य २००० वर्षांपूर्वी कालवरीच्या डोंगरावर घडले. क्रूसावर टांगलेल्या ख्रिस्ताची दुर्दशा पाहून कालवरीचा डोंगर हेलावून गेला. तेथील दगडांनाही पाझर फुटला व क्रूसावरून पडणाऱ्या ख्रिस्ताच्या अनमोल रक्ताने जमीन हादरून गेली.

आजही ख्रिस्त घरोघरी, गावा-गावात अन् समाजात विव्हळत आहे, रक्तबंबाळ होत आहे. आपले रोजचे जीवन जगत असताना आपल्याही जीवनात कालवरीचे डोंगर आड येत असतात. अशावेळी आपल्या दु:खाचा वधस्तंभ घेऊन फक्त स्वत:च्या कुटुंबासाठी नव्हे तर समाजासाठी ख्रिस्ताप्रमाणे मोडण्यासाठी आपल्याला प्रेरणा मिळावी म्हणून आपण विशेष प्रार्थना करू या.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे प्रभो, तुझ्या पुत्राने आम्हासाठी आपले रक्त सांडून पुनरुत्थानरहस्याची प्रतिष्ठापना केली. तुझ्या चांगुलपणाने आम्हाला पवित्र कर व आमचे नेहमी संरक्षण कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

**आमेन.**

किंवा

हे प्रभो, आदामाच्या पापामुळे आम्हावर मरण आले. परंतु तुझ्या पुत्राच्या दु:खसहनामुळे आमची मरणातून मुक्तता झाली. निसर्गनियमानुसार आदामासारखे मनुष्यरूप घेऊन आम्ही जन्मास आलो आहोत. पवित्र करणाऱ्या कृपेच्या सामर्थ्यामुळे आमच्या प्रभूसारखे रूप प्राप्त करून घेण्यास आम्हाला साहाय्य कर. तो सर्वकाळ जिवंत राहतो व राज्य करतो.

**आमेन.**

### सुरुवातीच्या प्रार्थनेनंतर

**भाग १ प्रभू शब्दविधी**

**निवेदक :** आता प्रभू शब्दविधीला सुरवात होईल, त्यात दोन हजार वर्षांपूर्वी ख्रिस्ताने दु:खसहन कशाप्रकारे भोगले यावर आजची तिन्ही वाचने प्रकाश टाकतात.

**निवेदक :** (पहिल्या वाचनापूर्वी)

लोकांना आरोग्य मिळण्यााठी देवपुत्राला फटके खावे लागले अशा शब्दात यशया संदेष्टा येशूच्या दु:खसहनाविषयी भाकीत करतो ते आजच्या पहिल्या वाचनातून अनुभवू या.

### पहिले वाचन

**यशया** ५२:१३-५३:१२

**प्रतिसाद स्तोत्र**

३०:२, ६, १२, १३, १५-१६, १७, २५

**निवेदक** : (दुसऱ्या वाचनापूर्वी)

उदरापासून कालवरीपर्यंत ख्रिस्ताने आपल्या पित्याशी एकनिष्ठ व आज्ञाधारक राहून क्रूसाला कवटाळीले, अगदी कुरकूर किंवा तक्रारही न करता. ख्रिस्ताच्या आज्ञाधारकतेमुळे आपल्या पित्याचे तारणकार्य कसे पूर्णत्वास नेले हा अनुभव संत पौलच्या इब्री लोकांस पाठविलेल्या पत्रातून घेऊ या.

### दुसरे वाचन

**इब्री लोकांस पत्र** ४: १४-१६, ५:७-९

## जयघोष

**फिलिप्पै.२:८-९**

**निवेदक:**(शुभवर्तमान वाचनापूर्वी)

**(दु:खसहनाचा वृत्तांत):** विश्वासघाताचं दु:ख सर्पदंशाहून अधिक विषारी असतं. माणूस माणसाचा विश्वासघात करतो त्यावेळी हृदयातील जखम व दु:ख आयुष्यभर काळजात वाहत राहते. ज्युदासच्या विश्वासघाताच्या प्रसंगापासून क्रूसापर्यंत ख्रिस्ताच्या दु:खाचा प्रवास सुरू झाला. त्या प्रवासात तो अडखळला, पडला, विव्हळला तरीही जगाला टाहो फोडून त्याने प्रीतीचा व क्षमेचा संदेश देत प्राण सोडला.

## शुभवर्तमान

**योहान १८:१-१९:४२ (प्रवचन)**

**निवेदक :** आता धर्मगुरू ख्रिस्तसभेच्या विविध हेतूंसाठी प्रार्थना करतील. धर्मगुरू, ख्रिस्तसभा, परमगुरूस्वामी, याजकवर्ग, प्रापंचिक, स्नानसंस्काराची तयारी करणारे, ख्रिस्ती ऐक्यासाठी, यहुदी बांधवासाठी, ख्रिस्तावर श्रध्दा न ठेवणाऱ्यांसाठी, सार्वजनिक पदावर काम करणाऱ्या व्यक्तींसाठी व गरजवंतांसाठी प्रार्थना केली जाईल. सर्वांनी प्रार्थनेत सहभाग घ्यायचा आहे.

## भाग २ क्रूसवंदना

निवेदक : आता विधीच्या दुसऱ्या भागाला सुरवात होत आहे. क्रूसाची मानवंदना

आता पवित्र क्रूसाची मानवंदना होईल. आजच्या दिवशी ख्रिस्तसभेत क्रूसवंदनेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कारण क्रूस हे ख्रिस्ताच्या आत्मबलिदानाचे प्रतीक आहे. मानवाला पापातून मुक्त करून त्याच्या तारणाचा मार्ग म्हणजे क्रूस. क्रूसाला वंदन करणे म्हणजे ख्रिस्ताला स्विकारणे व आत्मसात करणे. आता कपड्याने झाकलेला क्रूस वेदीवर आणला जाईल. धर्मगुरू प्रतिकात्मकरित्या क्रूसावरील कपड्याचे अनावरण करतील.

**''क्रूसाचे लाकूड पहा हो''** असे गायन गातील. आपले उत्तर असेल **''करूया वंदन क्रूसाला ख्रिस्त टांगला यावरती.''**

**(क्रूसाचे चुंबन घेण्यास लोक रांगेने येतील व चुंबन घेऊन झाल्यावर तिसऱ्या भागाला सुरूवात होईल.)**

## भाग ३ प्रभुभोजनविधी

**निवेदक :** (चर्चची घंटा होणार नाही. वेदी कपड्याने आच्छादली जाईल. मिस्साग्रंथ, प्रसादवस्त्र व ख्रिस्तशरीर पवित्र वेदीवर ठेवले जातील)

निवेदक : ख्रिस्तशरीर स्विकारणे म्हणजे परमेश्वराचा जवळून अनुभव घेणे. ख्रिस्तशरीर स्विकारणे म्हणजे ख्रिस्ताचे जीवन, मरण व पुनरुत्थान ह्यांच्याशी एक होणे. आता ख्रिस्तशरीर विधीला सुरूवात होईल. क्षणभर शांत राहून आपण चिंतन करू या की, ख्रिस्तशरीर स्विकारल्याने माझं जीवन ख्रिस्तकेंद्रित होत आहे का? ख्रिस्ताप्रमाणे दुसऱ्यांच्या अपराधांची क्षमा करण्यास मी तयार आहे का?

ख्रिस्तशरीर वाटप झाल्यानंतर.

निवेदक : धर्मगुरू आता शांततेने प्रस्थान करतील. आपण सर्वजण स्तब्ध राहू या. ख्रिस्तमरणाचे दु:ख अंत:करणात ठेवून त्यावर चिंतन करू या. आज अंतीम गीत घेतले जाणार नाही.

## चिंतन

आजच्या विधीतील वाचने प्रभू येशू ख्रिस्त हा एक सेवक, महायाजक आणि विश्वसम्राट आहे अशी त्याची ओळख करून देतात :

**अ) येशू - दु:खभोग सहन करणारा निरपराधी सेवक :** आजच्या पहिल्या वाचनात (यशया ५२:१३-५३:१२) यशया संदेष्टा प्रभू येशूच्या दु:खसहनाचे भाकित करतो. मुळात हे वर्णन बाबिलोनच्या हद्दपारीत दु:खयातना सहन करणाऱ्या इस्राएली लोकांविषयीचे आहे. प्रभूच्या सेवकाच्या दु:खभोगात ख्रिस्तसभा प्रभू येशूच्या दु:खसहनाचे पूर्वचिन्ह पाहते. त्यात जगाचे पाप, येशूचे निष्पाप दु:खसहन आणि येशूच्या दु:खसहनाची फळे ह्यांचे करूण वर्णन करण्यात आलेले आहे.

**ब) येशू अखिल मानवजातीसाठी मध्यस्थी करणारा महायाजक :** आजच्या दुसऱ्या वाचनात (इब्री. ४:१४-१६,५:७-९) इब्री लोकांस पत्र लिहिणारा लेखक येशूच्या दु:खभोगाचे वर्णन करतो. अशा दु:खाच्या प्रसंगीदेखील येशू पापी जगासाठी अश्रू गाळीत देवाजवळ विनवणी करतो.

**क) येशू धैर्याने दु:खाला सामोरा जाणारा विश्वसम्राट :** येशूच्या क्रूसामध्ये वेदना व मानहानी ह्यांचे मिश्रण दडलेले होते. परंतु योहानने वर्णन केलेल्या येशूच्या दु:खसहनात (योहान १८:१-१९:४२) येशू धैर्याने आल्या प्रसंगाला सामोरा जात असल्याचे वर्णन करण्यात आलेले आहे. समदर्शी शुभवर्तमाने (मत्तय, मार्क, लूक) येशूच्या गेथशेमाने बागेतील यातना वर्णन करताना 'बापा, शक्य असेल तर हा प्याला माझ्यापासून दूर कर.' ही येशूची प्रार्थना नमूद करतात. योहान मात्र ''पित्याने देऊ केलेला प्याला मी पिऊ नये काय?'' हे येशूने उच्चारलेले शब्द नमूद करून त्याचे धैर्य अधोरेखित करतो. इथे बागेचा उल्लेख योहान मुद्दामहून करतो. एदेन ह्या सुखाच्या बागेत पाप जन्माला आले तर गेथशेमाने ह्या दु:खाच्या बागेत तारण जन्माला आले असे त्याला सुचवायचे आहे.

**आत्मपरीक्षण :** येशूची वरीलपैकी कोणती प्रतिमा मला फार भोवते? का?

•••


**डॉन बॉस्को युथ सेंटर**
सलेशियन कॅटॅकेटिकल सेंटर
४ कोरेगाव पार्क, पुणे ४११ ००१
मो. ९९७५९४०६७२

**त्या प्रकाशाविषयी साक्ष देण्याकरिता**
**(योहान १:८)**
चिंतन : फा. रॉबर्ट डिसोझा वसई
(खाजगी वितरणासाठी)